# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र

# नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर

# दिनांक २६/११/२०२० (गुरुवार)

---

## फुस लावुन पळवुन नेले

१) पोलीस ठाणे नरखेड :– अंतर्गत दिनांक २१/११/२०२० चे १४.०० वा. ते १४.३० वा. दरम्यान सावरगाव येथिल फिर्यादी नामे शंकर डोमाजी हिरुडकर, वय ५० वर्षे यांचा १७ वर्षीय अल्पवयीन मुलगा हा शळेच्या कामाने जातो असे सांगुन घराबाहेर गेला असता परत आला नाही. सदरप्रकरणी संशयीत गौरव मेटांगळे याने फिर्यादी यांचे मुलास फुस लावुन पळवुन नेल्याचे फिर्यादी यांचे तक्रारीवरुन त्यांचेविरुद्ध पोलीस ठाणे नरखेड येथे कलम ३६३ भादंवि अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला. गुन्ह्याचा तपास पोलीस हवालदार धनराज भुक्ते करीत असुन आरोपी व अल्पवयीन मुलाचा शोध सुरु आहे.

## निष्काळजीपणे भरधाव वेगाने वाहन चालवुन मरणास कारणीभुत (अपघात)

१) पोलीस ठाणे काटोल :– अंतर्गत दिनांक २५/११/२०२० चे १३.०० वा. ते १३.३० वा. दरम्यान मौजा घरतवाडा येथे ट्रॅक्टर क्र. एमएच–३१ झेड–८६९३ चा चालक नामे सावन अशोकराव बोके, वय २५ वर्षे, रा. गोंडी मोहगाव याने आपला ट्रॅक्टर भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालविल्याने ट्रॅक्टर हा रस्त्याखाली उतरला व मातीच्या ढिगावरून ट्रॅक्टरचा मुंडा उसळल्याने त्याचे सोबत बसलेला विशाल गांगुर्डे हा ट्रॅक्टरचा मुंडा व ट्रॉलीच्या मध्ये अडकला आणि ट्रॅक्टर चालक ट्रॅक्टर वरून खाली पडल्याने ट्रक्टरचे ट्रॉलेचे मागील उजव्या बाजुचे चाक चालकाच्या डोक्यावरून गेल्याने जागीच मरण पावला.

सदरहु ट्रक्टर चालक आपले स्वत: चे मरनास कारणीभुत ठरल्याने सदर प्रकरणी फिर्यादी अर्जुन रामाजी भोई, वय ६० वर्ष, रा. घरतवाडा काटोल यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. काटोल येथे मृतक ट्रॅक्टर चालकाविरुद्ध कलम २७९, ३०४ (अ) भा.दं.वि. सहकलम १८४ मोटार वाहण कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्ह्याचा तपास पोलीस उपनिरीक्षक श्री. शाही हे करीत आहेत.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर.